पान ११ वरून

## संस्कृत ग्रंथांचे सखोल अवलोकन व्हावे

जननी असून, या भाषेतील काही ग्रंथसंपदा कालसापेक्ष आहेत. संस्कृतातील श्रेष्ठ कवी कालिदास हे विश्वाचे आद्यकवी आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्याचा विस्तार होणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात विद्यापीठाच्या डिजिटल ब्लॉगचे लोकार्पण मधुसूदन पेन्ना यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच विद्यापीठाकडून पुस्तक व हस्तलिखितांचे विमोचन करण्यात आले. यात सहा लेखकांच्या पुस्तकांचा समावेश आहेत. प्रा. भगीरथ प्रसाद त्रिपाठी यांना 'कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाला कुलसचिव अरविंद जोशी, परिषदेच्या समन्वयिका आणि संस्कृत व संस्कृतेतर भाषा शाखेच्या अधिष्ठाता डॉ. नंदा पुरी, सहसमन्वयिका डॉ. कविता होले, भारतीय धर्म तत्त्वज्ञान आणि संस्कृती शाखेचे अधिष्ठाता डॉ. मधुसूदन पेन्ना, वेदविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. सी. जी. विजयकुमार आदी प्रामुख्याने उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. नंदा पुरी, सूत्रसंचालन प्रा. पराग जोशी व रेणुका बोकारे, तर आभारप्रदर्शन कुलसचिव अरविंद जोशी यांनी केले. कार्यक्रमाला मुकुल कानिटकर, इग्नुचे जितेंद्र श्रीवास्तव, दिलीप म्हैसाळकर, डॉ. कुसुम पटोरिया, प्रभाकर भातखेडे, डॉ. गौरी माहुलीकर आदी मान्यवर उपस्थित होते.

### विदेशात संस्कृतला अधिक मान : डॉ. वैद्य

भारतभर वेगवेगळ्या संस्था संस्कृत भाषेसाठी कार्यरत आहेत. या संस्थांनी एकत्र येऊन संस्कृताच्या उत्थानासाठी चळवळ सुरू करण्याची गरज आहे. कारण, संस्कृत सर्वसामान्यापर्यंत पोहचणे महत्त्वाचे आहे. विदेशातील अनेक शाळांमध्ये संस्कृतातून प्रार्थना घेतली जाते. तर काही ठिकाणी एक तास संस्कृत संभाषणाची सक्ती आहे. मात्र, आपल्याच देशात संस्कृत भाषा दुर्लक्षित राहिली, अशी खंत यावेळी अध्यक्षपदावरून बोलताना डॉ. उमा वैद्य यांनी व्यक्त केली. विदेशातील लोकांकडून संस्कृत शिकण्याची वेळ आपल्यावर येऊ नये. संस्कृतीच्या रक्षणासाठी ही भाषा टिकणे आवश्यक आहे. यासाठी अशी संमेलने वारंवार व्हावी. यातूनच लोकांच्या मनावर संस्कृतचे महत्त्व बिंबवले जाईल व ही भाषा तळागाळात पोहचेल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

## काळा पैसा पांढरा करण्याचे षडयंत्रच!

२००९ साली सर्वोच्च न्यायालयात या संदर्भात याचिका दाखल करण्यात आली.